# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १८/०४/२०२४

## जबरी चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे बडनेरा अप नं. २८२/२०२४ कलम ३९२, ३४ भादवी | चंद्रानगर जवळ वडाच्या झाडाखाली जुनी वस्ती बडनेरा | घ ता वेळ - दि. १७/४/२०२४ चे १३.३० वा दा ता वेळ - दि. १७/४/२०२४ चे २१.१७ वा | निखील दत्ताजी चव्हाण वय २२ वर्ष धंदा खाजगी नौकरी रा ग्राम मसदी ता तिवसा जि अमरावती | दोन अनोळखी इसम (अं. २७/२८ वर्ष वयोगटातील, १)पांढ-या रंगाची टि शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट व तोंडाला पांढ-या रंगाचा दुप्पट्टा बांधला होता २)दुस-या इसमाचे अंगावर काळ्या रंगाचे टि शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट व तोंडाला भगव्या रंगाचा दुपट्टा बांधला | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे एक वर्षापासुन भारत फायन्स कंपनि गणपती नगर चितामणी पॅलेस जवळ MIDC रोड अमरावती येथे संगम मॅनेजर म्हणुन काम करतात. सदर भारत फायन्सस कंपनिच्या माध्यमातुन महिलाबचत गटांना लोन दिल्या जाते. आणी त्यांच्या कडुन हप्तेवारी किस्तीप्रमाणे पैसे वसुल करण्याचे काम फिर्यादी यांचे कडे आहे. आज दि. १७/४/२०२४ रोजी सकाळी ०६.१५ वा पासुन फिर्यादीने तेलीपुरा म्हाडा कॉलनी पाचबंगला चंद्रनगर इ. ठिकानावरुन महिला बचत गटाकडुन रक्कम वसुल करुन फिर्यादी हे १३.३० वा सुमारास त्यांच्या मोटार सायकल ने चंद्रनगर येथुन जात असतांना यातील आरोपी हे फिर्यादी जात असलेल्या रसत्यावर वडाच्या झाडाखाली उभे होते. सदर आरोपी फिर्यादी च्या गाडी समोर आले आणी त्यापैकी एका आरोपी ने फिर्यादीच्या पोटावर चाकु लावला व फिर्यादी जवळ असलेली २,०१,१०३/- रु रक्कम असलेली बॅग जबरीने हिसकावुन त्याच्या स्पेल्डर मोटार सायकल ने पळुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन गुन्हा कलम ३९२, ३४ भादवी प्रमाणे दाखल |
| २ | नांदगाव पेठ अप ंन १४८/२०२४ | शेंगाव नाका राजेश्वरी अमरावती | १७-४-२४ चे रात्री ०२-३० वा | एक महिला | ३ अनओळखी ईसम | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि ही आपल्या घराच्या बेडरुम मध्ये तिच्या लहान मुला सोबत असता यातील तीन अनोळखी ईसमाने बेडरुमच्या बाजुच्या दरवाज्यातुन घराच्या आत मध्ये घुसले व फि ला चाकुचा धाक दाखवुन म्हणाले कि चिल्लना मत चिल्लाएगी तो तेरे बच्चे को खुपस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम ३९४,३९७, ३४ भादवी | | दा १७-४-२४ चे १६-२८ वा | | | देंगे उठा उसको लेके चल सोहेल ईसको पुछ सोना कहा रख्खा है असे धमकावुन हॉलच्या सोफ्यावर फि ने ठेवलेल्या हॅंडबॅग मधील १) एक मिनि मंगळसुत्र सोन्याचे १३.८६० ग्रॅमचे कि अं ५८,२०५/- रु २) एक नेकलेस सोन्याचे २०.५०० ग्रॅमचे कि ंअं ७०.७८२/- रु असा एकुन १.२८.९८७/- रु चा ३) ईतर सोन्याचे दागीणे मोठी पोत (लगनातील) दोन तोड्याची व दोन बांगड्या एक नथ एक गळ्यातील मंगळसुत्र अशा मद्देमाल चाकुचा धाक दाखवुन जबरदस्तीने मुद्देमाल घेवुन गेले आहे अशा फि च्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | नागपुरी गेट अमरावती शहर अप क्र १४६/२०२४ कलम ३९७ ,३५२, २९४, ५०६(ब) १०८, १४३, १४६, १४७, १४८, १४९, ३२३, भा. द. वी. | प्लॅाट न. १८/१/४६ अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती | दि १७/०४/२०२४ चे ११/०० वा ते ११/३०वा दाखल ता. वेळ दि. १७/०४/२०२४ ते १७/५६ वा | सैय्यद खालीद अली रहेमत अली वय ५० वर्ष रा. मसानगंज इतवारा बाजार अम. | १)हमीद खान आलम खान २)जलील खान आलम खान ३)अजीज मामु ( हमीद यांचे मामु) ४)अब्दुल्ला ( हमीदाचा मुलगा) ५) शमीद ( हमीदाचा मुलगा)६)एजाज(हमीदचा साळा) ७)तन्नु (हमीदचा साळा) व इतर ५ ते ६ लोक वय अंदाजे २५ ते ३५ वर्ष सर्व रा. अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे पोलीस स्टेशन | हकीकत अशा प्रकारे आहे ेकी यातील फिर्यादी व आरोपी क्र. १ यांच्या मध्ये खाली प्लॅाट चा कब्जा बाबत वाद सुरु आहे नमुद घटणा ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे ेत्यांचे प्लॅाट न. १८/१/४६ अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे या ठीकाणी गेले असता आरोपी क्र १ वे २ व ईतर आरोपी यांचे हातात लोखडी पाईप व लाठी होती तसेच आरोपी क्र ६ व ७ यांच्या जवळ बटण असलेला चाकु होता सर्व आरोपी फिर्यादीच्या अंगावर जीवे मारण्याच्या उद्‌शाने आले आरोपी क्र. ३ याने काठी फिर्यादीच्या डोक्यावर मारली फिर्यादीने बचाव कैला असता त्याच्या करंगळीवर जोरात मार लागला आरोपी क्र २ याने लोखडी पाईप फिर्यादीच्या डोक्यावर मारला तर तो डाव्या डोळ्याच्या बाजुला लागला जिवे मारण्याच्या उद्देशाने आरोपी क्र. ४याने फिर्यादीचा गळा दाबुन गळफास लावला व आरोपी क्र. १,३, ३ व ७ हे शिवीगाळ करीत होते आरोपी क्र. ४ व ईतर आरोपी प्रोत्साहीत करत होते दरम्याण आरोपी क्र. ४ यांनी चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीच्या गळ्यातील १५ ग्रॅाम सोन्याची जुनी वापरती चैन कि. अ. ४५,०००/- रु. हिस्कावुन घेतली फिर्यादीने विरोध केला असता आरोपी क्र. ६ व ७ यांनी चाकु फिर्यादीच्या गळ्यावर मारण्यास वार कैला तो वार फिर्यादीने हुकवला व फिर्यादी पोलीस स्टेशनला रिपोर्ट देने करीता पोलीस स्टेशनला आले अशा फिर्यादीच्या लेखी तक्रार वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नागपुरी गेट अमरावती | |
| ४ | नागपुरी गेट अमरावती शहर अप क्र १४७/२०२४ कलम ३९७, ४५२, २९४, ५०६(ब) , १४३, १४६, १४७, १४८, १४९, ३५४, ३५४ (अ) ३२३, भा. द. वी. | प्लॉट न. १८/१/४६ अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती | दि १७/०४/२०२४ चे ११/०० वा ते ११/३०वा दाखल ता. वेऴ दि. १७/०४/२०२४ ते २१/०४ वा | अजीज खान रहेमान वय ७५ वर्ष रा. अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती | १)सैय्यद खालीद अली रहेमत अली २ शेख उस्मान ३)अब्दुल कलीम ४)अब्दुल हमीद ५)सईद ठेकेदार ६) सलीम ठेकेदार ७) शहाबुद्दीन व इतर ४ ते ५ लोक वय अंदाजे ३० ते ३२ वर्ष सर्व रा. अराफत कॉलणी परफेक्ट धरम काट्याचे मागे पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व जवई नामे हमीद खान आलम खान याचे आरोपी क्र. १ यांच्या मध्ये खाली प्लॉट चा कब्जा बाबत वाद सुरु आहे नमुद घटणा ता.वेऴी व ठीकाणी यातील नमुद सर्व आरोपी हे फिर्यादीच्या जावाईच्या खाली प्लॉट वर कब्जा करण्याच्या उद्देशाने घराच्या आत घुसुन लोखडी रॉड लोखंडी घन लोखंडी पाईप ने फिर्यादीच्या जवाईचे घराचे प्लॉटचे मागील भिंत तोडत होते तेव्हा फिर्यादीच्या नातुने घरी येवुन सांगीतले की नाना फुफुके खाली प्लॉट मे १० ते १२ आदमी अन्दर आये है और दिवारकी तोडफोड कर रहे फिर्यादी लगेच घटणास्थळा वर आले तेव्हा यातील सर्व नमुद आरोपी हे फिर्यादीच्या मुलीची खाली प्लॉट मधिल मागील भिंत तोडत होते फिर्यादीनी आरोपीस म्हटले दिवार क्यु तोड रहे हो यातील आरोपी क्र १ याने फिर्यादीस शिवीगाऴ करु डोक्यावर लोंखडी सब्बल नी वार कैला फिर्यादीने ते वार उजव्या हाताने वाचविला तर सब्बल उजवे हातावर लागली आरोपी क्र २ हा चाकु घेवुन मारण्यास धावला तर फिर्यादी हे खाली पडले आरोपी क्र ३ ते ६ सर्वानी मिळुन हाताबुक्यानी खुप मारले आरोपी क्र ०८ हा शिवीगाऴ करीत होता फिर्यादीच्या मुलीचा मुलगा आला असता त्याला आरोपी क्र ०१ याने अश्लील शिवीगाऴ केली आरोपी क्र. १ ते ३ हे फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्देशाने घन घेवुन (हातोडा) धावले आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीला मागुन पकडुन ठेवले व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा गळा दाबुन बोलला की आज तेरेको जान से मार डालेंगे असे म्हणुन फिर्यादीच्या हातातुन १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅाम कि. १५०००/- रु जबरीने हिसकावुन नेली त्या ठीकाणी फिर्यादीची मुलगी उभी होती तर आरोप क्र ४ व ५ यांनी फिर्यादीच्या मुलीचा हात पकडुन बोलला की तु यहासे चलेजा नहीतो तेरी बहोत बेज्जती करुगा तर फिर्यादीची मुलगी तेथुन निघुन गेली व फिर्यादी पोलीस स्टेशन ला रिपोर्ट देने करीता पोलीस स्टेशन ला आले अशा फिर्यादीच्या लेखी तक्रार वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ३८१/२०२४ कलम ३५४, २९४, ३२३, ५०४, ५०६ भादवी | अमरावती | दि १७/०४/२०२४ चे १२.४५ वा. दि १७/०४/२०२४ चे १७.१५ वा. | एक महिला | सयद सैफ अली अफसर अली २६ नंदनवन कॉलनी अमरावती | | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी व त्यांचे पती हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी दवाखान्यातुन घरी जात असतांना नमुद आरोपीने त्यांची मोपेड गाडी रॉग साईडने चालवुन फिचे गाडी जवळ अचानक आणली. फि चे पतीने त्यास हटकले असता फि चे पती सोबत वाद घातला मी कोणत्याही साईडने जाईल तुला काय करायचे आहे असे म्हणुन फि चे पतीला थापडां बुक्क्यांनी मारहाण केली फि ने माझे पतीला का मारतो आहेस विचारले असता फि ला सुध्दा तु जास्त बोलशील तर तर तुला मारेल असे म्हणुन धमकी दिली फि ला अश्लील भाषेत शिवीगाळ केली व दोन्ही हातांनी फिचा दुपटटा ओढला त्यामुळे फिला लज्जास्पद वाटले फि चा दुपटटा ओढल्यामुळे फि चे हाताला ओरबडल्या गेले त्यातुन रक्त निघाले व फि चे पतीला थापडाबुक्क्यांनी मारहाण केली त्यामुळे फि चे पतीचे डोळयाखाली जख्म झाली अशा फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ प्राणांतिक अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे वलगाव अप क्र.1 30/2024 कलम 304(A), 338 सह. 134(a) (b) | ग्राम शिराळा | दि.23/02/2024 चे 13/30 वा दाखल 17/04/2024 चे 23/42 वा. | **एक महिला** | अज्ञात चारचाकी वाहन | | हकिकत अशा प्रकारे आहे कि, दि.23/02/2024 रोजी मी सदर वेळी ते होन्डा शाईन क्र.MH 27 DM-0192 ने येत होते मला दुपारी 01/30 वा माझे पतीचे फोन वरुन कॉल आला व मला कोणीतरी सांगितले की,माझे पती शिराळा ता.जि.अमरावती येथे त्यांचे मोटर सायकलने क्र.MH 27 DM-0192 वरुन रस्त्याने जात असतांना अनोळखी चार चाकी वाहनाने वेगाने येवुन धडक दिली म्हणुन त्याचे डोक्याला मार लागला आहे.त्या नंतर माझे पतीस लोकांनी खाजगी दवाखाना सन शाईन हॉस्पीटल अमरावती येथे दाखल केले.तेव्हा मी तेथे पोहचले तेव्हा लोकांनी मला माझे पतीस धडक देणार ईसम हा न थांबता पळुन गेल्याने त्याचे वाहन क्र.पाहला नसल्याचे सांगितले.तरी माझ्या पतीच्या डोक्याची तेथे शस्त्रक्रीया झाली त्या नंतर मी माझ्या पतीस नागपुर येथील मेडीकल दवाखान्यात नेले.पन उपचार सुरु असतांना दि.20/03/2024 रोजी ते मरण पावले तरी माझे पतीच्या वाहनास भरधाव वेगाने गाडी चालवुन तसेच त्यांना वैद्यकीय मदत न देता पळुन जाणा-या अनोळखी चार चाकी वाहन चालका विरुध्द तक्रार आहे अशा जबानी रिपोर्ट वरुन मा.वपोनि सा.यांचे आदेशाने कलम 304(A),338 सह.134(a)(b) मो.वा.का.अन्वये गुन्हा दाखल |

## ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र २२९/२०२४ कलम ४,२५ आर्म ॲक्ट | राजासाहेब बार समोर बडनेरा रोड अमरावती | दि १७/०४/२०२४ चे १४.४० वा ते १५.१० वा दरम्याण दि १७/०४/२०२४ चे १८.०२ वा | सरतर्फे पोहेका मनीष करपे ब नं .१५२० पो .स्टे . राजापेठ अमरावती शहर | सूनील रामरावजी सोनवने वय ३५ वर्ष रा. गोपाल नगर मराठा कॉलनी अमरावती | नाही | थोडक्यात हकिकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी स्टाफ सह मीळालेल्या माहीतीवर जावून पाहीले असता यातील नमूद आरोपी याचे ताबयातून एक चायणा चाकू ज्याची एकूण लांबी ९.५ इंच असून क.अं.५००रू.चा माल मीळून आला आहे सदर चा माल पंचासमक्ष जप्त करणूयात आला वरून आरोपी विरूध्द वर नमूद कलमानूसार सदरचा गून्हा दाखल. |

## प्रोव्हीशन रेड :- ०१

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टै फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ३८२/२०२४ कलम ६५ ई मदाका | कुंभारवाडा फ्रेजरपुरा अमरावती | दि १७/०४/२०२४ चे १८/२० वा. | दि १७/०४/२०२४ चे २०/१९ वा. | पोहेकॉ रज्जक भिका शेकुवाले ब नं १५७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | रुक्साना युसुफ गोचीवाले वय ५० रा कुंभारवाडा फ्रेजरपुरा अमरावती | पोहेकॉ रज्जक भिका शेकुवाले ब नं १५७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | ळकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फि हे पो स्टाफ सह पो स्टे हददीहत पेट्रोलीग करीत असतांना गुप्त माहीतीचवे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष प्रो रेड केंली असता नमुद आरोपीचे ताब्यात विनापरवाना अवैधरित्या एक प्लास्टीक पिशवी ज्यामध्ये ११ नग देशी दारु बॉबी संत्रा च्या १८० एमएलच्या पावटया किं ७७०/— रु.चा प्रोव्ही मुददेमाल मिळुन आला सदर मुददेमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला नमुद आरोपीचे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने सदर आरोपी विरुध्द फि च लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे सिटी कोतवाली मर्ग क्र १९/२०२४ कलम १७४ जाफौ | रेल्वेपुलावर अमरावती | अनोळखी पुरुष वय अंदाजे ५० वर्ष | सरतर्फे पोहेका मनोज काळपांडे बं नं ९८६ पो.स्टे सिटी कोतवाली अम शहर | समजुन आले नाही | आज दि.१७.४.२०२४ रोजी १४.०० ते २१.०० वा पावेतो पो.स्टे ला स्टे डा अंमलदार म्हणुन डयुटीस असतांना पोहेका मनोज बं नं ९८६पो.स्टे कोतवाली यांनी ईर्वीन दवाखाना येथुन मरणाचा मेमो क्र ०४१७ प्रमाणे मृतक अनोळखी पुरुष वय अंदाजे ५० वर्ष रेल्वे पुलावर मृत अवस्थेत बॉथ डेथ Death body kept in mertury for ३ days then pm ड़ बनसोड मँडम यांचे स्वाक्षरीच्या पो.स्टे ला आणुन दाखल |